# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

२० फेब्रुवारी, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १९/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, दुर्गापुर, रामनगर, बल्लारशाह, घुग्घुस, पडोली, वरोरा, भद्रावती, ब्रम्हपुरी, नागभिड, मुल, सावली, धाबा, विरूर, गडचांदुर, पोंभुर्णा** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२१** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०९** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **३,१८,५००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १)पोलीस स्टेशन वरोरा :—

दिनांक **१९/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **वरोरा** अंतर्गत ०३ आरोपी हे ५२ ताश पत्त्यावर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **वरोरा** येथे अप. क्र. **१७४/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०३ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **५,३२०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **वरोरा** पोलीस करीत आहे.

---

### २)पोलीस स्टेशन नागभिड :—

दिनांक **१९/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **नागभिड** अंतर्गत ०४ आरोपी हे ५२ ताश पत्त्यावर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **नागभिड** येथे अप. क्र. **५०/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **१,०६५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **नागभिड** पोलीस करीत आहे.

---